



# पारनेर दर्शन







वर्ष १ अंक ३०९, शुक्रवार ३० ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# काळकुपकरांनी साकारला नदीजोड प्रकल्प!

## ■ एक हजार एकर जमीन ओलिताखाली ■ ग्रामस्थांच्या एकीच्या वज्रमुठीचे दर्शन

काळकुप : प्रतिनिधी

**काळकुपच्या ग्रामस्थांनी एकत्र येत खासदार नीलेश लंके यांच्या सहकार्यातून साकारलेल्या अनोख्या नदीजोड प्रकल्पामुळे एक हजार जमीन ओलीताखाली येणार आहे. खा. लंके यांच्या उपस्थितीत ही योजना कार्यान्वीत करण्यात आली.**

काळकुप जवळून कापरी नदी वाहत असतानाही त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत नव्हता. या नदीचे वाहून जाणारे पाणी गावातील मध्यवर्ती असलेल्या तलावामध्ये आणणे आवश्यक होते. गावातील तलाव कधीतरी भरत असल्याने तलाव असूनही त्याचा फारसा फायदा होत नव्हता. कै. भागाशेठ खरमाळे यांनी या नदीजोड प्रकल्पाचे स्वप्न पाहिले होते. त्यासाठी त्यांनी प्रयत्नही केले. त्यांच्या पश्चात सरपंच ताराबाई कदम सरपंच झाल्यानंतर आपल्या कुटूंबाला सरपंचपदाचा मान दिल्याबद्दल ग्रामस्थांच्या ऋणातून उतराई होण्यासाठी नदीजोड प्रकल्पाची मोहीम यशस्वी करण्यासाठी परीश्रम घेतले.



■ एक हजार एकर जमीन ओलीताखाली येणारा नदीजोड प्रकल्प खा. नीलेश लंके यांच्या उपस्थितीत कार्यान्वीत करण्यात आला.

### ७१ लाखांचे अंदाजपत्रक

या योजनेसाठी ७१ लाख रूपयांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. भागाशेठ कदम यांनी १२ ते १३ लाख रूपयांच्या मदतीचे योगदान दिले. ग्राम निधीतून २ लाख ७५ हजार, लोकवर्गणी ५ लाख ५० हजार, वॉटर शेड ऑर्गनायझेशन ट्रस्टचे संतोष चौधरी यांनी इटन कंपनीकडून १८ लाख रूपयांची मदत मिळवून दिली. भाऊसाहेब खरमाळे, राजेंद्र कदम, किसन शिंदे, मच्छिंद्र खरमाळे, पांडूरंग कदम, आबासाहेब मते यांच्यासह ग्रामपंचायत सदस्यांनी या कामात महत्वाची भूमिका बजावली.

### काळकुपकरांची एकजुट

गावाला सुजलाम सुफलाम करणारे हे जलमंदिर उभे करण्यासाठी गावाने एकजुट दाखविली. खा. नीलेश लंके यांच्या उपस्थितीत ही योजना कार्यान्वीत करण्यात आली. या प्रकल्पामुळे एक हजार एकर क्षेत्र ओलीताखाली येणार असून गाव एकत्र आले आणि त्यास योग्य नेतृत्व आणि मार्गदर्शनाची जोड लाभली की गावाचा कायापालट होण्यास वेळ लागत नाही हे काळकपुकरांनी कृतीतून सिध्द केले आहे.

### १ हजार ७५० मिटर पाईपलाईन

नदीजोड प्रकल्प पुर्ण करण्याचा विडा उचलण्यानंतर या कामासाठी मोठा खर्च अपेक्षीत होता. सरपंच कदम यांचे चिरंजीव भागाशेठ कदम यांनी बंधाऱ्यापासून नदीपर्यंतचे १ हजार ७५० मीटर पाईपलाईनद्वारे पाणी आणण्याचे नियोजन करण्यात आले.

### खा. लंके यांची मदत व मार्गदर्शन

पाईप अस्तरीकरणासह मोठया पाईपची या प्रकल्पासाठी आवश्यकता होती. ही संकल्पना खा. नीलेश लंके यांच्यासमोर मांडण्यात आल्यानंतर त्यांनी पाईपअस्तरीकरण तसेच मशीनरीसाठी मदत व मार्गदर्शन केले.

# आमदार नितेश राणेंचा थेट अधिकाऱ्यांना दम

## ■ पोलीसांनी वाकड्यात जावू नये ■ सरकार कोणाचे आहे बघावे

इस्लामपूर : प्रतिनिधी



**छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याच्या मुद्द्यावर राजकरण तापले असताना आता नितेश राणे यांनी एक आक्रमक भाषण देत थेट पोलीसांना दम भरला आहे. तसेच विरोधकांना सुद्धा विशाळगडावरील अतिक्रमणावरुन टोला मारला आहे.**

आमदार नितेश राणे यांनी आज इस्लापूर शहरात सभा घेतली यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना आतापासून इस्लापूरला सर्वांनी ईश्वरपूर बोलायला सुरू करा अशी सूचना दिली आहे. जसे औरंगाबादचे संभाजीनगर केले तसेच इस्लमापुरचे ईश्वरपूरचा जीआर घेऊन मी पुन्हा इथे येईल असे नितेश राणे म्हणाले. इस्लाम मधील सर्वांनी हिंदु बना आम्ही वाजत गाजत स्वागत करू. ईद आणि मोहरम मध्ये जेवढं वेळ चालेल तेव्हढाच आमच्या गणेशोत्सवात काळात डिजे वाजणार गणेशोत्सवात आगावू पणा करून त्यांना सोडणार नाही असा दम त्यांनी भरला.

यानंतर पोलीसांकडे उर्वरीत पान ३ वर

# अजितदादांच्या सभेत मराठा आंदोलकांचा गोंधळ !

## आरक्षणाबाबतची भूमिका स्पष्ट करण्याची मागणी

वसमत : प्रतिनिधी



**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसंवाद यात्रेदरम्यान मराठा आंदोलकांनी हिंगोलीतील वसमतच्या सभेत गोंधळ घातला. उपमुख्यमंत्री अजित पवार स्टेजवर जाताच काही मराठा आंदोलकांनी मराठा आरक्षणाबाबतची भूमिका स्पष्ट करण्याची मागणी करत घोषणाबाजी करत गोंधळ घातला होता. घोषणाबाजी करणाऱ्या १४ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आलाय. राष्ट्रवादी काँग्रेसच्या लातूर सभेवेळी हा गोंधळ झाला होता. आता हिंगोलीच्या वसमतच्या सभेवेळीही असाच प्रकार घडला आहे.**

वसमतमध्ये अजित पवार यांच्या नेतृत्वात जन सन्मान यात्रा आयोजित करण्यात आली होती. या निमित्ताने वसमत शहरात भव्य सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत आजित पवार भाषणाला उभे राहताच मराठा आंदोलकांनी सभेत गोंधळ घातला आहे. एक मराठा लाख उर्वरीत पान ३ वर





# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या


# AI अन् AGI

**सध्या जगभरात कृत्रिम बुद्धीमत्तेची (AI) जोरदार चर्चा सुरू आहे. दिवसेंदिवस त्यामध्ये नवनव्या सुधारणा होत असल्याचे दिसून येत आहे. ओपन एआय कंपनीचे सीईओ सॅम ऑल्टमन यांनी आर्टिफिशियल जनरल इंटेलिजेन्स (AGI)च्या विकासासाठी अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक करण्याची तयारी दाखविली आहे. ते 'द वॉल स्ट्रीट जर्नल'ला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी ही माहिती दिली. सध्या अस्तित्वात असलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) अत्युच्च विकास म्हणून एजीआयकडे पाहिले जात आहे. दुसरीकडे तंत्रज्ञान क्षेत्रातील अनेक जागतिक कंपन्यांमध्ये यामुळे भीतीचे वातावरण पसरले आहे.**





## एआय आणि एजीआयमध्ये काय फरक आहे ?

एआय (AI) आणि एजीआय (AGI) यामध्ये नक्कीच फरक आहे. मुख्य फरक आहे व्याप्ती आणि क्षमतेचा! एआय एखादी विशिष्ट कृती करण्यासाठी तुम्हाला मदत करू शकेल. उदाहरणार्थ- चित्र ओळखणे, त्यावर प्रक्रिया करणे, भाषांतर करणे वा तुमच्याबरोबर बुद्धिबळासारखा खेळ खेळणे. एआयकडून ही सगळी कामे मानवापेक्षा जलद आणि अचूक गतीने केली जात असली तरीही त्याची क्षमता तेवढ्या एखाद्या कृतीपुरतीच मर्यादित राहते. दुसऱ्या बाजूला एजीआय एखाद्या कृतीपुरते मर्यादित नाही. त्याची क्षमता आणि व्याप्ती एआयपेक्षा अधिक मोठी असेल. ते अगदी मानवी बुद्धिमत्तेप्रमाणे अचूकपणे एकाच वेळी अनेक कामे करू शकेल. त्यामुळेच एजीआयबाबतच्या घडामोडींकडे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकासाचे अत्युच्च शिखर म्हणून पाहिले जात आहे. संशोधकांकडून एआयच्या क्षमतांमध्ये वाढ करण्याचे प्रयत्न आधीपासूनच केले जात आहेत. म्हणूनच नोव्हेंबर २०२२ मध्ये चॅटजीपीटीसारखे एआय माध्यम बाजारात आल्याबरोबर अल्पावधीतच इतके लोकप्रिय झाल्याचे दिसून आले. ते अगदी मानवी बुद्धिमत्तेप्रमाणेच मजकुरावर प्रक्रिया करू शकते, हेच त्यामागचे कारण आहे. तेव्हापासून एआय हा विषय अधिक प्रमाणात चर्चेला आला. सध्या त्यामधील संशोधनाला अधिकाधिक गती देण्यासाठी अब्जावधी डॉलर्स खर्च केले जात असल्यामुळे आता दिवसेंदिवस एआयची माध्यमे अधिकाधिक विकसित होत आहेत. एजीआय हे याच एआय विकासाचे अत्युच्च शिखर ठरेल, यात शंका नाही.




## एजीआय म्हणजे काय ?

एजीआयमुळे एखाद्या मनुष्याला करता येईल असे कोणतेही काम मशीन अथवा सॉफ्टवेअरलाही करता येईल. त्यामध्ये तर्कवितर्क, सामान्य ज्ञान, कार्यकारणभाव इत्यादी मानवी कौशल्यांचा समावेश असेल. अगदीच सोप्या शब्दांत सांगायचे झाले तर, एजीआयमुळे मशीनला मानवी बुद्धीप्रमाणेच काम करता येईल. मशीनदेखील माहीत नसलेल्या गोष्टी नव्याने शिकणे, नव्या अनुभवांमधून शिकणे आणि प्राप्त केलेली माहिती वापरात आणण्यासारख्या अनेक गोष्टी मानवाप्रमाणेच शिकू शकेल. मनुष्य त्याच्या अनुभवांमधून विविध गोष्टी शिकतो. घर, शाळा वा इतर ठिकाणांमधून त्याला बऱ्याच गोष्टी शिकायला मिळतात. एखाद्या गोष्टीचे निरीक्षण करून वा लोकांशी संवाद साधून वा पुस्तके, टीव्ही अशा माध्यमांतूनही त्याची जडणघडण होते आणि त्याच्या मेंदूचा विकास होतो. त्यानंतर मनुष्याचा मेंदू विविध अडचणींवर मार्ग काढण्यासाठी या सगळ्या अनुभवांतून प्राप्त झालेल्या माहितीचा वापर करतो. एजीआयमुळे एखादे सॉफ्टवेअर अथवा मशीनदेखील अगदी हीच क्षमता प्राप्त करू शकेल. कृत्रिम बुद्धिमत्तेचा एवढा विकास प्रत्यक्षात आणण्याचे संशोधकांचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे मानवी मेंदू ज्याप्रमाणे काम करतो अगदी तसेच काम एजीआयमुळे मशीनलाही करता येऊ शकेल, या दृष्टीने संशोधक काम करीत आहेत. म्हणजे कुशाग्र बुद्धिमत्तेचा यंत्रमानव अगदी माणसासारखाच तुमचा मित्र असेल. तो तुम्हाला काय म्हणायचे आहे ते अगदी सहजपणे समजून घेऊ शकेल, नव्या गोष्टी शिकू शकेल आणि एखाद्या समस्येवर त्याच्या बुद्धिमत्तेने उपायही काढू शकेल.




## ही पूर्णपणे नवी कल्पना आहे का ?

नाही. ही पूर्णपणे नवी कल्पना आहे, असे म्हणता येणार नाही. २० व्या शतकात पहिल्यांदा एजीआयची संकल्पना मांडण्यात आली होती. कृत्रिम बुद्धिमत्तेचे जनक मानल्या जाणाऱ्या ॲलन ट्युरिंग यांनी आपल्या शोधनिबंधामध्ये सर्वप्रथम ही संकल्पना मांडली होती. त्यांनी 'कॉम्प्युटिंग मशिनरी ॲण्ड इंटेलिजेन्स' (१९५०) या शोधनिबंधामध्ये यंत्रांची बुद्धिमत्ता मोजण्यासाठी 'ट्युरिंग टेस्ट' नावाची नवी संकल्पना मांडली होती. ट्युरिंग टेस्टनुसार एखादे मशीन जर माणसाबरोबर माणसाप्रमाणेच संवाद साधू शकत असेल, तर ते मानवी बुद्धिमत्तेचेच प्रदर्शन करीत असल्याचे द्योतक आहे, असे सांगण्यात आले होते. ट्युरिंग यांनी हा शोधनिबंध लिहिला तेव्हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास अजिबात झालेला नव्हता. इतकेच काय, संगणकही त्याच्या प्राथमिक अवस्थेत होता. मात्र, ट्युरिंग यांनी ही संकल्पना मांडल्यामुळे अशा प्रकारच्या यंत्रांच्या अस्तित्वाबाबतच्या चर्चांना सुरुवात झाली होती. मानवी बुद्धिमत्तेची क्षमता असणाऱ्या अशा यंत्रांच्या फायद्या-तोट्यांवरही चर्चा होऊ लागल्या.

## एजीआयचा मानवासाठी काय फायदा होऊ शकतो ?

तात्त्विकदृष्ट्या एजीआयचे असंख्य सकारात्मक फायदे सांगता येऊ शकतात. उदाहरणार्थ- आरोग्याच्या क्षेत्रामध्ये एजीआयचा वापर केल्यास कमी कालावधीमध्ये अचूक पद्धतीने रोगाचे निदान, उपचाराची पद्धती आणि रुग्णपरत्वे औषधोपचारही निश्चित करता येऊ शकतात. इतक्या मोठ्या प्रमाणावर असलेल्या माहितीच्या विस्तृत साठ्याचे कमी कालावधीत विश्लेषण करून निर्णय घेणे ही मानवी बुद्धिमत्तेच्या पलीकडे जाणारी गोष्ट आहे. मात्र, एजीआयमुळे हे वास्तवात येऊ शकते.




अगदी अर्थकारणात आणि व्यवसायांमध्येही एजीआयचा वापर प्रभावीपणे केला जाऊ शकतो. एजीआयद्वारे सद्यःस्थितीतील बाजाराचे अचूक विश्लेषण करून अंदाज वर्तविण्याचे कामही सहजतेने होऊ शकते. शिक्षण क्षेत्राचे उदाहरण घेतल्यास, एजीआयमुळे प्रत्येक विद्यार्थ्याच्या अनोख्या गरजा पूर्ण करता येऊ शकतात. प्रत्येकाची क्षमता ओळखून, त्याच्या गरजेनुसार त्याला शिक्षण देण्याची व्यवस्था अस्तित्वात आणता येऊ शकते.

## संशयाचे वातावरण का ?

एकीकडे एजीआयचे इतके फायदे सांगितले जात असताना दुसरीकडे मात्र त्याबाबत भीतीही व्यक्त केली जात आहे. एजीआय प्रणाली विकसित करण्यासाठी होणारा उर्जेचा वापर आणि ई-कचऱ्याच्या निर्मितीमुळे पर्यावरणावर होणारा परिणाम हा चिंतेता विषय आहे. एजीआयमुळे रोजगारामध्येही मोठ्या प्रमाणावर घट होऊ शकते; तसेच सामाजिक आणि आर्थिक विषमतेमध्येही प्रचंड वाढ होऊ शकते, असे म्हटले जात आहे. दुसरीकडे ज्यांच्या हातात एजीआयचे नियंत्रण असेल त्यांच्या हातात इतरांपेक्षा अधिक अधिकार येऊ शकतात. असे झाल्यास, त्यामुळे नव्या प्रकारच्या समस्या आणि व्यवस्था उदयाला येऊ शकते; ज्याची आपण कल्पनाही केलेली नसेल. जर मनुष्य एजीआय तंत्रज्ञानावर अधिकाधिक विसंबून राहू लागला, तर तो आपल्या मूलभूत मानवी क्षमता आणि कौशल्येही गमावून बसण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. एजीआय मानवी क्षमतेला ओलांडून त्याच्याही पुढे जाऊ शकते, हाच एजीआयबाबतचा सर्वांत मोठा धोका आहे. असे झाल्यास, मानवाला एजीआयच्या संभाव्य कृती समजून घेणे आणि त्यांचा अंदाज वर्तविणेही कठीण होऊ शकते. अनेक साय-फाय चित्रपटांमध्ये मानवाचे यंत्रमानवांवरील नियंत्रण सुटून, ते अधिक शक्तिशाली झाल्याचे चित्रण केले गेले आहे. चित्रपटांमध्ये असे यंत्रमानव मानवी कल्याणाच्या विरोधात जाताना दिसतात. अगदी तसेच काहीसे येणाऱ्या भविष्यात वास्तवात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. बीबीसीला २०१४ मध्ये दिलेल्या मुलाखतीमध्ये दिवंगत प्राध्यापक स्टीफन हॉकिंग म्हणाले होते, "कृत्रिम बुद्धिमत्तेचा संपूर्ण विकास झाला, तर मानवजातीचा अंतही होऊ शकतो." त्यामुळेच एजीआयचा विकास हा मानवी मूल्यांशी सुसंगत आणि मानवाच्या सुरक्षिततेला धरूनच व्हायला हवा. त्यासाठी अनेक विचारवंत मांडणी करताना दिसतात.

# 'ॲपल'चाही फोन हॅक होऊ शकतो!

**ॲपलचा संपूर्ण व्यवसाय आपल्या फोन आणि कॉम्प्युटरमध्ये कोणीही घुसखोरी करू शकत नाही या विश्वासावर आधारित असल्याने त्यांच्यासाठी फोन हॅक होणे मोठे आव्हान बनले आहे.**

जगातील सर्वात सुरक्षित मोबाइल फोन आणि कॉम्प्युटर बनवण्याचा दावा करणाऱ्या ॲपल या कंपनीने आपले उत्पादन वापरणाऱ्यां संदेश पाठवला आहे की, मर्सनेरी स्पायवेअरद्वारे हेरगिरी सॉफ्टवेअरद्वारे त्यांचे फोन हॅक केले जाऊ शकतात, त्यामुळे वापरकर्त्यांनी सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. हा संदेश ॲपलने भारतासह ९१ देशांतील त्यांच्या ग्राहकांना ई-मेलद्वारे पाठवला आहे. हे सॉफ्टवेअर वादग्रस्त ठरलेल्या 'पेगासस' स्पायवेअरप्रमाणे आहे. सहा महिन्यांपूर्वीही ॲपलने भारतातील काही लोकांना त्यांचे फोन पेगाससचे लक्ष्य असू शकतात, असा इशारा दिला होता. यातील बहुतांश विरोधी पक्षांचे नेते होते, त्यामुळे याबाबत बराच गदारोळ झाला होता. पण सरकारच्या दबावाखाली ॲपलने आपला इशारा मागे घेतला. तथापि, या वेळी कंपनीने आपल्या ग्राहकांना अत्यंत गांभीर्याने सावध केले आहे. भारतातील काही वापरकर्त्यांना ११ एप्रिलला पहाटे साडेबाराच्या सुमारास धोका सूचना (थ्रेट नोटिफिकेशन) पाठवली गेली. यामध्ये म्हटले होते की, आपला फोन 'भाडोत्री स्पायवेअर'द्वारे लक्ष्य केला जात आहे. मात्र, या हेरगिरी सॉफ्टवेअरद्वारे ज्यांचे फोन हॅक करण्यात आले, त्यांची नावे त्यांनी उघड केलेली नाहीत. तथापि, जगभरात असे हल्ले होत असल्याचे कंपनीने मान्य केले आहे.




### ॲपल जगातील आघाडीची कंपनी

ॲपल ही तंत्रज्ञानाच्या विश्वातील जगातील सर्वांत आघाडीची कंपनी आहे. २००७ मध्ये पहिला आयफोन बाजारात आला. त्यानंतर आज दीड दशकानंतरची स्थिती पाहिल्यास जगभरात १.४७ अब्ज लोकांकडे ॲपलचा फोन आहे. जगात वापरल्या जाणाऱ्या स्मार्टफोनमध्ये ॲपलचा वाटा २१.६७ टक्क्यांहून अधिक आहे. ॲँड्रॉइडच्या स्मार्टफोनपेक्षा ॲपल फोनच्या किमती काही पटींनी अधिक असतात. त्यामुळे आयफोन वापरणे हे भारतात स्टेटस सिम्बॉल ठरले आहे. अधिक प्रमाणात पैसे देण्यामागे प्रतिष्ठेखेरीज आणखी एक कारण म्हणजे या फोनची सुरक्षितता. ॲँड्रॉइड प्रणालीपेक्षा ॲपलची आयओएस ही प्रणाली अधिक प्रगत, अद्ययावत आणि तुलनेने अधिक सुरक्षित मानली जाते. असे असूनही ॲपलचे अत्यंत सुरक्षित मानले जाणारे फोन हॅक होत असतील, तर मग ॲँड्रॉइडवर चालणाऱ्या इतर फोनच्या सुरक्षेची काय स्थिती असेल याची कल्पनाच न केलेली बरी! ॲपलने कबूल केले आहे की ही घुसखोरी कोणत्याही सामान्य सायबर चोराच्या आवाक्यातली नाही. कारण ज्या सॉफ्टवेअरद्वारे हा हल्ला केला जात आहे त्याची किंमत लाखो डॉलर्स आहे. ॲपल या सॉफ्टवेअरवर मात करण्यासाठी काही व्यवस्था करू शकेल की नाही हे येणारा काळच सांगेल, पण लोकांच्या गोपनीयतेमध्ये घुसखोरी केल्याबद्दल जगातील सर्व सरकारे आता पुन्हा निशाण्यावर येणार आहेत.

### नक्की काय होते ?

पेगासेस हे सॉफ्टवेअर खरे तर एक प्रकारचे गुप्तहेर आहे. हे सॉफ्टवेअर कोणाच्याही फोनमध्ये गुपचूप इन्स्टॉल केले जाऊ शकते आणि त्यानंतर त्या फोनचा कॅमेरा, माइक इत्यादींवर नियंत्रण मिळवून तो संबंधित चोराला आपल्या पद्धतीने ऑपरेट करता येतो. सायबर सुरक्षा कंपनी कॅस्परस्कीच्या अहवालानुसार, पेगाससच्या मदतीने एन्क्रिप्टेड ऑडिओ आणि एनक्रिप्टेड संदेशदेखील वाचले जाऊ शकतात. एन्क्रिप्टेड केलेले संदेश असे असतात जे केवळ संदेश पाठवणाऱ्या आणि प्राप्तकर्त्यालाच माहीत असतात. ज्या कंपनीच्या प्लॅटफॉर्मवर मेसेज पाठवला जात आहे ती कंपनीदेखील पाहू शकत नाही किंवा ऐकू शकत नाही. पण पेगासस वापरून हॅकर त्या व्यक्तीच्या फोनशी संबंधित सर्व माहिती मिळवू शकतो. २०१९ पर्यंत हे फोनमध्ये व्हॉट्स ॲप मिसकॉलद्वारे देखील इंस्टॉल करता येत होते. आयफोनमध्ये, आयमेसेज या बगचा फायदा घेऊन ते इंस्टॉल केले जायचे. आता तर कंपनीने अधिकृतरित्या संदेश पाठवून इशारा दिल्यामुळे आयफोन वापरकर्त्यांच्या चिंता कमालीच्या वाढल्या आहेत. खुलेआम वापरकर्त्यांच्या स्मार्टफोनवर डल्ला मारला जात असेल तर तो गोपनीयतेच्या आणि खासगीपणाच्या अधिकाराचा भंग आहे. त्यामुळे सरकारने याबाबत गांभीर्याने लक्ष घालून सुरक्षिततेसंदर्भात पुढाकार घ्यायलाच हवा.



### आधी चिंता, त्यात आणखी भर...

सुमारे तीन वर्षांपूर्वी जेव्हा भारतात पेगाससचा वापर उघडकीस आला, तेव्हा बराच गदारोळ झाला होता. सर्वोच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल करण्यात आल्या. हे सॉफ्टवेअर इस्त्रायली सरकारने विकले असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे याबाबत मखलाशी करताना इस्त्रायल सरकार म्हणते की, कोणत्याही स्वतंत्र व्यक्ती किंवा कंपनीला आम्ही ते विकत नाही; तर केवळ सरकारांनाच हे सॉफ्टवेअर दिले जाते. त्यामुळे हे प्रकरण अधिकच गंभीर बनले होते. सायबर गुन्हेगारी, हॅकिंगपासून ते डीपफेकपर्यंतच्या आधुनिक धोक्यांमुळे भारतासारख्या देशात आधीच चिंतेचे वातावरण आहे आणि यावर मात करणे सरकारसाठी मोठे आव्हान बनले आहे. अशा परिस्थितीत पेगासस, मर्सनेरी यांसारख्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून हेरगिरी आणि घुसखोरीचे प्रकरण सिद्ध झाल्यास ती अधिक गंभीर बाब ठरेल.

# Facebook खात्याचा पासवर्ड विसरलात का?

सध्या सोशल मीडिया ॲप्सचा ट्रेंड झपाट्याने वाढत आहे. लोकांना घरी बसून मोकळ्या वेळेत सोशल मीडिया स्क्रोल करायला आवडते. फेसबुक वापरत नाही असा व्यक्ती तर शोधून सापडणार नाही. फेसबुक खाते नेहमी फोनवर लॉग इन केले जाते. परंतु काहीवेळा तुम्हाला तुमच्या फोन किंवा पीसी व्यतिरिक्त इतर डिव्हाइसवर Facebook लॉग इन करावे लागेल. अशा परिस्थितीत, बऱ्याच वेळा वापरकर्त्यांना त्यांचा पासवर्ड आठवत नाही आणि ते त्यांच्या खात्यात लॉग इन करू शकत नाहीत. तुम्हालाही अशीच समस्या असेल तर आज आम्ही तुम्हाला त्यावर उपाय सांगत आहोत. तुम्ही तुमचा फेसबुक पासवर्ड सहजपणे रीसेट करू शकता. यासाठी तुम्हाला फक्त तुमचा नोंदणीकृत ईमेल आयडी किंवा फोन नंबर लक्षात ठेवावा लागेल.



फेसबुक पासवर्ड कसा रिसेट करायचा ते स्टेप बाय स्टेप समजून घ्या...

### फेसबुक पासवर्ड कसा रीसेट करायचा...

- सर्वप्रथम तुम्हाला www.facebook.com वर जावे लागेल. यानंतर फेसबुक लॉगिन पेज ओपन करावे लागेल.
- त्यानंतर तुम्हाला तुमचा ईमेल आयडी टाकावा लागेल. त्यानंतर Forget Password वर क्लिक करा.
- आता एक नवीन स्क्रीन उघडेल ज्यामध्ये तुम्हाला तुमचा मेल आयडी किंवा तुमचा फोन नंबर टाकावा लागेल.
- आता तुम्हाला एका पृष्ठावर पुनर्निर्देशित केले जाईल ज्यामध्ये तुम्हाला तीन पर्याय मिळतील. यामध्ये Google खाते वापरा, ईमेलद्वारे कोड पाठवा किंवा संदेशाद्वारे कोड पाठवा.
- त्यानंतर तुम्ही कोणताही पर्याय निवडाल, तुम्हाला एक कोड दिला जाईल.
- नंतर स्क्रीनवर कोड प्रविष्ट करा.
- एक नवीन पृष्ठ उघडेल ज्याद्वारे तुम्ही तुमचा पासवर्ड बदलू शकाल.
- आता तुमच्या Facebook खात्याचा पासवर्ड रीसेट केला जाईल ज्याद्वारे तुम्ही तुमच्या Facebook वर सहज लॉगिन करू शकाल.



# शॉर्ट न्यूज

## पाथर्डीत शेतकरी जनआक्रोश मोर्चा

**पाथर्डी :** सरकारकडे शेतकऱ्यांची चकीत रक्कम देण्यासाठी पैसे नाहीत. मात्र, निवडणूक डोळ्यासमोर ठेवून अनेक योजनांच्या थाटामाटाने घोषणा केल्या जात आहेत. शेतकऱ्यांपासून सर्वसामान्य लोकांचा हातात काहीच मिळत नसून सरकारने शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपये असून ते देण्याची सरकारची मानासिकता नाही, असा आरोप आ. प्राजक्ता तनपुरे यांनी केला. पाथर्डी तहसीलचर महाविकास आघाडीच्यावतीने आ. तनपुरे व प्रदेश सरबिटणीस ॲड. प्रताप ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

## घुलेंच्या मेळाव्यात राजळे यांच्यावर टीका

**शेवगाव :** मतदारसंघात प्यायला पाणी नाही, रस्ते नाहीत, कोट्यवधींचा पीक विमा आणला म्हणतात. मात्र, शेतकऱ्यांच्या हाती रुपया नाही, शेअर मार्केटमध्ये लोकांचे कोट्यवधी रुपये बुडाले, मात्र दहा वर्षानंतर त्यांनी विधानसभेत आवाज उठवला, मतदारसंघ गहाण ठेवला, अशी नाव न घेता टीका करत यावेळी परिवर्तन करा व चंद्रशेखर घुले यांना विधासनसभेत पाठवा, असे आवाहन माजी आ. नरेंद्र घुले यांनी केले. हरिहरेश्वर येथे आयोजित शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते.

## तिसगावमध्ये छेडछाडीचे प्रकार वाढले

**तिसगाव :** विद्यालयाच्या परिसरातील वृद्धेश्वर चौकामध्ये शाळा परिसरातील टवाळखोर तरुण थांबून शालेय विद्यार्थिनींना त्रास देण्याचा प्रयत्न करतात. याठिकाणी संस्थेची बदनामी नको म्हणून शाळेकडून घडलेल्या प्रकारानंतर माफीनामा लिहून घेतला जातो व प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला जातो. शाळा परिसरामध्ये मुलींची छेड काढण्याचे प्रकार घडत असल्याने पोलिसांनी याची गांभीर्याने दखल घ्यावी व संबंधितांवर कडक कारवाई करावी, अशी ग्रामस्थांनी मागणी केली.

## ऑलिम्पियाड परीक्षेत विद्यार्थ्यांचे यश

**श्रीगोंदा :** तालुक्यातील विविध विद्यालयांतील दहा हजार विद्यार्थ्यांनी रयत ऑलिम्पियाड परीक्षेत सहभागी होत विशेष प्रावीण्य मिळविले. या परीक्षेत महादजी शिंदे विद्यालयातील धैर्यशील बाळू शिंदे, नितीन वाळके, श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे, कन्या विद्यालयातील श्रावणी राजू शिर्के, बेलवंडी येथील छत्रपती शिवाजी विद्यालयातील पूर्वा विठ्ठल गायकवाड या विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य मिळविले. या विद्यार्थ्यांना पुढील दोन वर्षांसाठी शिष्यवृत्ती मिळणार आहे.

# संपाबाबत सरकारी कर्मचाऱ्यांची माघार

## येत्या बुधवारी ठरवणार पुढील दिशा

**मुंबई : प्रतिनिधी**

**बेमुदत संपावर जाण्यावरून सरकारी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या संघटनेत मतभेद असल्याचे चित्र नुकतेच समोर आले. राजपत्रित अधिकारी संघटनेने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चेनंतर संप स्थगित केला; मात्र २९ ऑगस्टपासून संपावर जायचे की नाही याबाबतचा निर्णय कर्मचारी संघटना बुधवारी (ता. ४) घेणार आहे.**



राज्य सरकारी, निमसरकारी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समिती महाराष्ट्र राज्यातर्फे २९ ऑगस्टपासून पुकारण्यात आलेल्या बेमुदत संप राज्य सरकारच्या विनंतीवरून तूर्तास स्थगित करण्यात आला आहे. ४ सप्टेंबरच्या बैठकीनंतर पुढील निर्णय व दिशा ठरवण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा समन्वय समितीचे निमंत्रक रावसाहेब निमसे व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी दिली आहे.

राज्य सरकारने दिलेल्या आश्वासनानूसार सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेचा शासन निर्णय निर्गमीत होण्यासाठी २९ ऑगस्टपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय समन्वय समितीने घेतला होता. त्या अनुषंगाने राज्यातील सर्व कर्मचारी, शिक्षकांमध्ये संपावर जाण्यासाठी उत्स्फूर्त तयारी दर्शवली होती. मुख्यमंत्र्यांनी समन्वय समितीच्या पदाधिकाऱ्यांना चर्चेसाठी बोलावले असता निमंत्रक विश्वास काटकर यांनी स्पष्टपणे सांगितले की, आपण केंद्र सरकार ने जाहीर केलेल्या युपीएस पेन्शन योजना राज्यात लागू करण्याच्या निर्णयाबद्दल नाराजी व्यक्त करीत मागील बेमुदत संपाच्या पार्श्वभूमीवर विधानसभेत जाहीर केल्याप्रमाणे सुधारीत निवृत्ती वेतन योजना शासन निर्णय प्रसिद्ध होत नाही, तोपर्यंत बेमुदत संप मागे घेतला जाणार नसल्याचा समन्वय समितीचा निर्णय झाला असल्याचे सांगितले. त्यावर मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान यांचा दौरा व इतर कार्य व्यस्ततेमुळे आपल्या बरोबर चर्चा होऊ शकली नाही. आपल्या मागणीवर मी सहमत आहे, परंतु, या संदर्भात संबंधितांशी आवश्यक चर्चा करण्यासाठी चार दिवसांचा अवधी द्यावा, तोपर्यंत बेमुदत संप मागे घेण्याची विनंती केली.

या विस्तारित समन्वय समितीची ऑनलाइन बैठक मंगळवारी (ता. २७) सर्व घटक संघटनेचे प्रमुख नेते व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे पदाधिकाऱ्यांसमवेत पार पडली. यामध्ये चर्चा होऊन ४ सप्टेंबर रोजी समन्वय समितीची विस्तारित ऑनलाइन बैठक घेऊन मधील काळात शासनाचा प्रतिसाद व प्रगती व प्रत्यक्ष झालेले निर्णय आणि शासनाच्या भूमिकेच्या अनुषंगाने या बैठकीत समन्वय समिती बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. समन्वय समितीच्या पुढील आंदोलनाची दिशा व निर्णय ४ सप्टेंबरच्या बैठकीनंतर कळविण्यात येणार आहे. गरज भासल्यास यापेक्षा जास्त ताकदीने संघर्ष करण्याची तयारी समन्वय समितीने दर्शवली आहे.

(पान १ वरून)

## आमदार नितेश राणेंचा थेट अधिकाऱ्यांना दम

रोख धरत नितेश राणे म्हणाले, कुणाला सिंघम व्हायचे असेल तर होऊ द्या. मला पोलीस नोटीस पाठवणार हे मला माहित आहे. पोलिसांनी माझ्या आडवे जाऊ नये, सरकार कुणाचे आहे ते बघा, गृहमंत्री कोण आहे बघा असे राणे म्हणाले. लव्ह जिहादच्या तक्रारी घेतल्या नाहीत तर अधिकारी २४ तास पण खुर्चीवर राहणार नाही असा दम नितेश राणेंनी दम भरला.

**पोलीसांची खुर्ची हिंदू धर्माच्या रक्षणासाठी वापरा**

पोलीसांना दिलेली खुर्ची हिंदू धर्माच्या संरक्षणासाठी वापरा. कुराण मध्ये फक्त हिंदूंचा कट्टरवाद आहे मग त्यावेळी पोलीस आहे की आणखी कोण आहे हे तो जिहादी पाहणार नाहीत. पोलिसांवर हल्ला करण्याऱ्या जिहादीला मदत करणार का? असा पलट सवाल नितेश राणे यांनी पोलिसांना केला आहे. कोणीही पोलीस अधिकारी वाकड्यात जात असेल तर जाऊ नको बाबा खरंच माझ्या वाकड्यात जाऊ नको सरकार कोणाचे आहे बघ, अशी थेट चेतावणी नितेश राणे यांनी दिली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावरून वेगळ्या पद्धतीचे राजकारण सुरू आहे, पुतळा बनवणाऱ्या कलाकार आपटेला आम्ही पोलिसांनी सोडून दिले की नक्की आपटणार अशी भूमिका नितेश राणेंनी घेतली. विशाळगडावरील अतिक्रमणवर विरोधक शिवप्रेमी कधीच बोलले नाही. विशाळगडावर हिरव्या चादरी टाकत आहे. महाराजांच्या गड किल्ल्यांची काय अवस्था करून ठेवली आहे. सिंधुदुर्गकडे जाणाऱ्या नेत्यांना विशाळगड वरील जिहाद्यांचे अतिक्रमण दिसले नाही का? सिंधुदुर्ग मध्ये गेलेल्या नेत्यांना विशाळगड वरील अतिक्रम दिसत नाहीत का? असा सवाल त्यांनी विरोधकांना केला. पुढे राणे म्हणाले विशाळगडावर बुलडोझर घेऊन जाऊ आणि जिहाद्यांची आतिक्रमणे काढून टाकू. आजपासून इस्लामपूर नव्हे तर ईश्वरपूर म्हणा, जो म्हणत नाही त्याला पाकिस्तान मध्ये पाठवा. देशाचे पंतप्रधान , राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री, गृहमंत्री कडवे हिंदुत्ववादी आहेत. पोलिसांनी हे सगळे डायरीत हे लिहून ठेवा,म्हणजे तुम्हाला पुन्हा सूनवण्याची वेळ येणार नाही. आम्ही येत्या महिन्यात ईश्वरपूरचा जीआर घेऊन येतो, सरकार पातळीवर प्रकिया सुरू आहे अशी माहिती राणेंनी भाषणातून दिली.

## अजितदादांच्या सभेत मराठा आंदोलकांचा गोंधळ !

मराठा अशा घोषणांनी स्टेज परिसरात चांगलाच गोंधळ उडाला होता. अचानक मोठ्या प्रमाणात मराठा आंदोलक दाखल झाल्याने पोलिसांचा चांगलाच गोंधळ उडाला होता. शेवटी पोलिसांनी मध्यस्ती करत आंदोलकांना सभा स्थळापासून बाजूला नेत हे आंदोलन शांत केले. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आम्ही निवेदन देण्यासाठी आलो आहोत. परंतु, पोलीस बळाचा वापर करून आम्हाला निवेदन देऊ दिलं जात नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

# विठ्ठल-रुक्मिणी पूजेची आता घरबसल्या बुकिंग

## १ ऑक्टोबरपासून संकेतस्थळावर नोंदणीची सोय

**पंढरपूर : प्रतिनिधी**

**श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या नित्यपूजा, पाद्यपूजा, तुळशी पूजा, चंदन उटी पूजा इत्यादी पूजा भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. या पूजा नोंदणी करण्यासाठी मंदिर समितीने संगणक प्रणाली विकसित केली असून लवकरच ऑनलाइन पद्धतीने पूजेची नोंदणी सुरू करण्यात येत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.**



याबाबत मंदिर समितीच्या २० ऑगस्ट रोजी सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखालील सभेत निर्णय घेण्यात आला होता. यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली असून भाविकांना पूजेची नोंदणी https: www. vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे. भाविकांना अल्प देणगी मूल्य आकारून विविध प्रकारच्या पूजा उपलब्ध करून देण्यात येतात. तथापि, या पूजांचे बुकिंग ऑनलाइन पद्धतीने करण्याबाबत भाविकांकडून मागणी होत होती. याबाबतची संगणक प्रणाली विकसित झाली असून चाचणी घेण्याचे काम सुरू आहे. येत्या पंधरा दिवसांत काम पूर्ण होऊन १ ऑक्टोबरपासून बुकिंग सुरू करण्यात येणार आहे.

# संगमनेरमध्ये काँग्रेसचे तीव्र आंदोलन

## पुतळ्याला अभिवादन करून सरकारचा निषेध

**संगमनेर : प्रतिनिधी**

**संपूर्ण देशवासीयांचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांचा रत्नागिरी समुद्रकिनाऱ्यावरील पुतळा अवघ्या आठ महिन्यातच कोसळल्याने संपूर्ण महाराष्ट्रात मोठा संताप निर्माण झाला आहे. या घटनेच्या निषेधार्थ संगमनेरमध्ये युवक काँग्रेस व शिवप्रेमी आणि महाविकास आघाडीच्या वतीने तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले.**



यावेळी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, युवक काँग्रेसच्या अध्यक्ष डॉ. जयश्री थोरात, शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे, तालुकाध्यक्ष मिलिंद कानवडे, शिवसेनेचे अमर कतारी, राष्ट्रवादीचे बी.जी. देशमुख, सेवादलाचे अध्यक्ष सुरेश झावरे, निखिल पापडेजा, अर्चना बालोडे, नवनाथ आरगडे, सुभाष सांगळे, पद्माताई थोरात, अमृता राऊत आदींसह युवक काँग्रेसचे सर्व कार्याध्यक्ष, सरचिटणीस, पदाधिकारी व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सरकारचा निषेध करत बसस्थानक ते नवीननगररोड निषेध मोर्चा काढण्यात आला. यानंतर प्रांताधिकारी कार्यालय येथे निवेदन देण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे दैवत आहे. त्यांचा पुतळा कोसळणे हे महाराष्ट्रासाठी अत्यंत वेदनादायी आणि संतापजनक आहे. असे असताना शासन मात्र ही जबाबदारी एकमेकांवर ढकलाढकली करत आहेत. अत्यंत बेपर्वाही असलेले हे सरकार बेताल वक्तव्य करत आहेत. जनतेने या सरकारला कडक शिक्षा दिली पाहिजे. शिक्षणमंत्री सुद्धा या संवेदनशील विषयावर बेजाबाबदार वक्तव्य करतात ही अत्यंत चिंताजनक असून या महाराष्ट्र सरकारचा आपण निषेध करत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. याप्रसंगी शितल उगलमुगले, प्रदीप हासे, आनंद वर्पे, शुभम राहणे, अक्षय ढोकरे, वैष्णव मुर्तडक, शुभम पेंडभजे, विशाल ढोले, मनीष राक्षे, शुभम शिंदे ,रोशन गोपने, ऋतिक राऊत , सचिन खेमणर,अनिल कांदळकर, पप्पू कानकाटे, सागर कानकाटे, तात्या कुटे आदींसह महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सर्वांनी राज्य सरकारचा निषेध करत छत्रपती शिवाजी महाराज यांचा विजय असो, अशा घोषणांनी संगमनेर दणाणून दिले.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा उभारलेला पुतळा अवघ्या आठ महिन्यात कोसळणे या अत्यंत दुर्दैवी आणि वेदनादायी आहे. खरे तर महाराजांनी उभारलेले गड किल्ले हे चारशे वर्षापासून तसेच आहेत आणि या भ्रष्टाचारी सरकारने उभारलेल्या पुतळा अवघ्या आठ महिन्यात कोसळला आहे. यामधील ठेकेदार आणि भ्रष्टाचारांना कडक शिक्षा झाली पाहिजे याचबरोबर या सरकारने या घटनेची जबाबदारी घेतली पाहिजे दुर्दैवाने राज्याचे उपमुख्यमंत्री सुद्धा नौदलावर या घटनेची जबाबदारी ढकलतात, हे अत्यंत दुर्दैवी आहे. नौदल हे सागरी किनाऱ्याचे रक्षण करते. मात्र, त्यांच्यावर आरोप करून त्यांचे मानसिक खच्चीकरण करणे चुकीचे आहे. सरकारने जबाबदारी घेतली पाहिजे. ठेकेदार आणि भ्रष्टाचारांना कडक शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी डॉ. जया थोरात यांनी यावेळी केली.









# स्व.उषादेवी खिलारी : मायेचा अखंड झरा!

**कविवर्य फ.मुं. शिंदे म्हणतात
आई हे एक नाव असतं
घरातल्या घरात गजबजलेलं गाव
असतं**



आई हे प्रत्येकाच्या मनात वसलेले,गजबजलेले गाव असते.साऱ्या नात्यांना प्रेमाच्या रेशीमनात्याने बांधून ठेवणारी,घराला एक ठेवणारी,मायेची ऊब देणारी प्रेमळ व्यक्ती असते.असेच व्यक्तिमत्व जिजीचे म्हणजेच स्व.उषादेवी सिताराम खिलारी यांचे होते.

एकीकडे वाढते शहरीकरण व त्याचा ग्रामीण भागावर होणारा परिणाम त्यामुळे मी आणि माझे या पलिकडे लोक विचार करत नाहीत मात्र स्व.उषादेवी त्यात वेगळ्या ठरल्या ! पाथर्डी तालुक्यातील मांडवे गावातील कै.माधवराव लवांडे यांच्या कन्या. १९४६ साली हनुमान जयंतीचा जन्म.वडील माधवराव लोकल बोर्डामध्ये असल्यामुळे त्यांचे वास्तव्य नगरमध्येच होते. आई कौसल्याबाई संस्कारी व धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या त्यामुळे घरातील मुलींवर ते संस्कार झाले. कौसल्याबाईंचे माहेर कान्हुर पठारचे सोनावळे कुटुंबाचे माजी आमदार रावसाहेब म्हस्के यांच्या मध्यस्थीने उषाताईचा विवाह १९६१ साली टाकळी ढोकेश्वर मधील खिलारी कुटुंबातील सिताराम खिलारी यांच्याशी झाला. अन् सुरु झाला अण्णा आणि जिजींचा संसार सहा आपत्यांपैकी चिरंजीव बापुच्या आकस्मिक निधनाने त्यांच्यावर खुप मोठा आघात झाला. सिताराम अण्णा खिलारी हे बहुआयामी व्यक्तिमत्व

**कर्तृत्वान पुरुषाच्या मागे एक खंबीर स्त्री असतेच अण्णांनी २५ वर्षे गावाचे सरपंचपद भुषविले,२००३ पासुन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेचे विश्वस्त आहेत त्यांचा राजकारणा वावर मात्र मागे कुटुंबाकडे जिजीने बारकाईने लक्ष दिले.**

समाजकारण,शिक्षण, अध्यात्म,कृषी राजकारण यासोबतच स्वतःचे एकत्रित कुटुंब,अण्णांचा व्याप मोठा असल्याने कुटुंबाकडे त्यांना फारसा वेळ देता आला नाही मात्र ती जबाबदारी जिजींनी समर्थपणे पेलली.

कर्तुत्ववान पुरुषाला पत्नीची खंबीर व मोलाची साथ असेल तरच कुटुंब उभी राहतात. समाजाला आदर्श निर्माण करतात याच मुर्तीमंत उदाहरण म्हणजे खिलारी कुटुंब.कुटुंबामध्ये अण्णांचे ज्येष्ठ बंधु माधवराव त्यांच्या पाच मुली,एक मुलगा आणि जिजी अण्णांच्या तीन मुली व दोन मुले असा एकत्रित कुटुंबाचा मोठा विस्तार. अण्णा आणि जिजी स्वतः सुशिक्षित असल्याने घरातील सर्वांवर त्यांनी चांगले संस्कार केले व एक आदर्श पिढी तयार केली.उषाताईना लहानपणापासुन हृदय विकार होता मात्र आजाराकडे दुर्लक्ष करत कुटुंब समृद्ध केले.शांत,संयमी स्वभाव व स्वतःतील आध्यात्मिक प्रवृत्तीच्या जोरावर त्यांनी शेवटपर्यंत हसत मात केली.

-शब्दांकन-
**डॉ.भाऊसाहेब खिलारी**
**अध्यक्ष : सावली सामाजिक प्रतिष्ठान टाकळी ढोकेश्वर**

आज खिलारी कुटुंबाचा बहरलेला वटवृक्ष म्हणजे जिजींचे व अण्णांचे समर्पणच ! बाईंच्या कन्या फडके,शिर्के,बोठे,सोनावळे व गवळी या कुटुंबामध्ये दिलेल्या असुन सर्वजणी आपल्या कुटुंबात सुखी आणि रममाण आहेत.

पुतण्या बाबासाहेब वकील असुन यशस्वी व्यावसायिक आहेत सध्या तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष आहेत. अण्णांच्या तीनही कन्या विजया,सुरेखा,सीमा व जावई आपल्या उद्योग व्यवसायात अग्रेसर आहेत. जिजी, अण्णांचे ज्येष्ठ चिरंजीव डॉ. भाऊसाहेब स्वतः चा वैद्यकीय व्यवसाय सांभाळून संघटनात्मक कामे व समाजकारणामध्ये त्यांचा सक्रीय सहभाग असतो.विविध संस्थांवर कार्यरत आहे.अण्णांच्या संस्काराची छबी त्यांच्यामध्ये दिसुन येते.धाकटे चिरंजीव शिवाजीराव स्वतःचा व्यवसाय सांभाळून अण्णांच्या राजकीय पावलावर पाऊल ठेवून पुढे जात आहेत.गावाचे सरपंचपद त्यांनी यशस्वीपणे भुषविले आहे.



तीनही सुना प्रतिभा,डॉ.स्वाती,जयश्री यांच्यावर त्यांनी स्वतःच्या मुलीप्रमाणे माया केली व सुनांनीही जिजींची आईप्रमाणे खूप सेवा केली.त्यांची सर्व नातवंडे उच्चविद्या विभूषित असून वेगवेगळ्या क्षेत्रात आपला नावलौकिक कमावत आहेत स्व.उषाताईच्या अतिशय सुसंस्कृत व संस्कारी वागण्यामुळे बोलण्यामुळे त्या परिसरातील तसेच सर्व आप्त,नातलग,पाहुणे मंडळी यांच्या गळ्यातील ताईत बनल्या होत्या,आपल्या आदर्श व सर्व समन्वयक वृत्तीने त्या सर्वांना हव्याहव्याशा वाटत होत्या,त्यांच्यावरील प्रेमापोटी टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांनी उस्फुर्तपणे त्यांच्या मृत्युदिनी संपूर्ण गाव बंद ठेवून त्यांच्या प्रती असलेली आपली कृतज्ञता व्यक्त केली. त्या केवळ खिलारी परिवाराच्याच जिजी नव्हत्या तर गावच्या जिजी होत्या.एक,सात्विक,सालस,सोज्वळ, घरंदाज,आदर्श,कर्तबगार सर्वगुणसंपन्न जिजी अर्थात स्व.उषादेवी होत्या.

# सुप्यातील उद्योजकांशी मंत्री विखे यांचा संवाद

## विविध समस्या दूर करण्याची ग्वाही



**■ सुपा औद्योगिक वसाहतीमधील उद्योजकांशी पालकमंत्री राधाकृष्ण विखे संवाद साधला.**

**पारनेर : प्रतिनिधी**

**पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी बुधवारी पारनेर-सुपा औद्योगिक वसाहतीमधील उद्योजकांशी संवाद साधून त्यांच्या विविध समस्या दूर करण्याची ग्वाही पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिली.**

नव्याने विस्तरीत औद्योगिक वसाहतीमध्ये मोठया संख्येने उद्योग येत असून त्यातून रोजगार निर्मितीही होत आहे. उद्योजकांना सर्व सुविधा देण्यात येत असून त्यांच्या इतर समस्या दूर करण्यासाठी पुढाकार घेण्यात येणार असल्याचे मंत्री विखे म्हणाले. लाडकी बहिण योजनेचे तालुकाध्यक्ष सुनील थोरात हे मंत्री विखे यांच्यासमवेत होते. वरून बेव्हरेजेसचे प्लांट हेड मनोज धोंडे, रवी भुवन, स्वप्निल तांबे, संकेत महाडीक, अमोल दसगुडे, निर्मल कुंभारे, हरीष कापसे, निर्विती कळमकर हे यावेळी उपस्थित होते.

म्हसणे फाटा येथे तुषार पवार, सुनील पवार, मनोज मुंगसे, अजिंक्य दरेकर, बंटी बारहाते, सतिश डवणे, महेश जारकर, स्वप्निल कळमकर, जयवंत शिंदे कुणाल रणसिंग यांच्या वतीने मंत्री विखे यांचा सत्कार करण्यात आला. टाकळीढोकेश्वर येथे सिताराम खिलारी व त्यांच्या कुटूंबियांची भेट घेऊन विखे यांनी सांत्वन केले.

अळकुटी येथे घरकुलांच्या जागेसाठी सुरू असलेल्या उपोषणकर्त्यांची विखे यांनी भेट घेऊन या प्रश्नातून मार्ग काढण्यासाठी प्रांताधिकारी तसेच तहसिलदार यांच्याशी चर्चा केली. या उपोषणकर्त्यांनी या प्रश्नात लक्ष घातल्याबद्दल मंत्री विखे यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

# दादा तुम्ही लढा ; आम्ही तुमच्या पाठीशी आहोत !

## विश्वनाथ कोरडे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**निघोज : प्रतिनिधी**

**भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विश्वनाथ कोरडे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कोरडे दादा तुम्ही विधानसभा लढवा , आम्ही तुमच्या पाठीशी आहोत ! अशा प्रकारच्या शुभेच्छा वाढदिवसाप्रसंगी देण्यात आल्या.**

यावेळी तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, विविध संस्थांचे पदाधिकारी व भाजपचे नेते मंडळी तसेच सर्व पक्षीय कार्यकर्ते व नेते मंडळी यांनी उपस्थित राहून कोरडे यांचा सत्कार करीत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.दुपारी चार ते रात्री दहा वाजेपर्यंत हा वाढदिवस सत्कार व शुभेच्छा कार्यक्रम सुरू होता. यावेळी आलेले कार्यकर्ते, नेतेमंडळी व मान्यवर तसेच ग्रामस्थ यांच्यासाठी नाष्टा व्यवस्था करण्यात आली होती. भाषणबाजीचा फार्स न ठेवता जुन्या रेकॉर्डींग गाणे ऐकण्याचा मनमुराद आनंद उपस्थितांनी घेतला. कोरडे यांचे स्थानिक कार्यकर्ते व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी आलेल्या जनतेचे स्वागत केले.



**■ भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य व जिल्हा परिषद माजी सदस्य विश्वनाथदादा कोरडे यांचा वाढदिवस निमित्ताने सत्कार करण्यात आला. ( छाया : रोहन उनवणे निघोज )**

भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी गेली दहा ते पंधरा वर्षांच्या कार्यकाळात पारनेर तालुका, विधानसभा मतदारसंघ व जिल्ह्यातील केलेल्या विकासकामांची आलेल्या मान्यवरांनी कौतुक केले. कोरडे दादा एक अभ्यासू व्यक्तिमत्त्व असून गेली दहा ते पंधरा वर्षात त्यांनी जिल्हा परिषद सदस्य, भाजपचे तालुका अध्यक्ष तसेच राज्य कार्यकारिणी सदस्य म्हणून भाजपच्या वरिष्ठ नेतेमंडळी मध्ये असणारी त्यांची उठबस पाहाता व त्यांची काम करण्याची पद्धत सर्वसामान्य जनतेला भावणारी असून कोनतेही काम घेऊन जा काम होणारच ही खात्री जनतेला असल्याने त्यांच्याकडे सातत्याने जनतेची कामासाठी गर्दी होत असते ही भावना यावेळी आलेल्या जनतेतून व्यक्त होत होती.

दुपारी चार ते दहा वाजेपर्यंत तब्बल दिड हजार लोकांनी सत्कार करीत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तसेच दिवसभर विश्वनाथ कोरडे यांचा भ्रमणध्वनी वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी खणखणत होता. विशेष करून आगामी विधानसभा निवडणुक तुम्ही लढा मतदारसंघातील जनता तुमच्या मागे ठामपणे उभी आहे अशी मागणी आलेल्या जनतेतून होत होती.

**गेली दहा ते पंधरा वर्ष समाजात काम करताना सामाजिक, शैक्षणिक , राजकीय, धार्मिक कामात अग्रभागी राहात काम केले हे फक्त जनतेसाठी केले आहे. जनतेचे प्रेम भरभरून मिळाले आहे. जिल्हा परिषद सदस्य असताना मोठ्या प्रमाणात तालुक्यातील विकासकामे करता आली. भाजपचा पदाधिकारी असलो तरी पक्षीय कार्यकर्ते यांचीच काम करायचे यापेक्षाही जनता जनार्दन यांचे कामे करुण महत्वाचा विकास करायचा हाच उद्देश ठेवला म्हणून जनतेचे प्रेम आज खऱ्या अर्थाने मिळाले आहे. हीच प्रेमाची शिदोरी आयुष्यभर मिळणार आहे हा मला ठाम विश्वास आहे. आपण पक्षाचे काम विश्वासाने करीत आहोत याची जाण नेतेमंडळींना आहे. ते सांगतील तो आदेश शिरसावंद्य मानून आपण पुढील वाटचाल करणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.**

# निर्धार ग्रामिण विकासाचा पुस्तिकेत दयानंद पवारांच्या कामाची दखल

## मंत्री गिरीष महाजन यांच्याकडून कौतुक

**पारनेर : प्रतिनिधी**



**पारनेर पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी दयानंद पवार यांनी केलेल्या कामांची ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या वतीने प्रसिध्द करण्यात आलेल्या निर्धार ग्रामिण विकासाचा या पुस्तिकेत दखल घेण्यात आली आहे.**

ग्रामविकास, पंचायत राज व पर्यटन मंत्री गिरीष महाजन यांनी गटविकास अधिकारी पवार यांना पत्र पाठवून त्यांचे कौतुक केले आहे. आपले सहकार्य आणि दृढ विश्वासामुळेच मी ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या मंत्रीपदाचा कार्यभार समर्थपणे . सांभाळू शकतो असल्याचे नमुद करून या पत्रात नमुद करण्यात आले आहे की, गेली दोन वर्षे आम्ही ग्रामीण जनतेच्या विकासाकरिता केंद्र तसेच राज्य शासनाच्या योजनांचा आढावा घेऊन त्यात योग्य त्या सुधारणा करून प्रत्येकाचे दैनंदिन जीवनमान उंचावण्यासाठी सतत कार्यशील आहोत.

सर्व पायाभुत सुविधा प्रत्येक गाव, खेडे, पाडे, वस्तीपर्यंत पोहचविण्यासाठी आपण सक्षम यंत्रणा निर्माण करून ती सतत क्रियाशील रहावी म्हणून अथक परिश्रम घेत आहोत. म्हणूनच विभागाने मागील दोन वर्षात केलेल्या कामांची आणि आपल्या श्रमांची माहीती निर्धार ग्रामीण विकासाचा या पुस्तिकेच्या माध्यमातून सर्वांसमोर नम्रपणे मांडतो आहे. आपल्या परिश्रमांची फलश्रुती समाधानकारक असून या पुस्तीकेच्या माध्यमातून ती सादर करताना सार्थ अभिमान वाटत असल्याचे महाजन यांनी या पत्रात नमुद केले आहे.

# निघोजचे मंडल अधिकारी कायमच दांडीवर!

## जनतेतून नाराजीचा सूर । कायमस्वरुपी नियुक्तीची मागणी

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज मंडलमध्ये वाड्या वस्त्यासहीत जवळपास पंधरा ते वीस गावे असून शेतकऱ्यांना शासकीय कामकाजासाठी मंडल अधिकाऱ्याची प्रभारी नियुक्ती न करता कायमस्वरूपी नियुक्ती करावी अशी मागणी तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेशशेठ लाळगे यांनी तहसीलदार गायत्री सौंदाणे व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली आहे.**

गेली सहा महिन्यांपूर्वी शेकटकर मंडल अधिकारी होते त्यांना बढती मिळाली त्यांची बदली झाली. त्यानंतर आप्पा शिंदे यांनी दोन महिने काम पाहिले ते सुद्धा बढतीच्या ठिकाणी गेले . त्यानंतर वडझिरे मंडल अधिकारी वृषाली करोसिया यांनी निघोजचा प्रभारी पदभार घेतला मात्र दोन महिन्यांत फक्त चार वेळा निघोज या ठिकाणी येऊन मला शक्य होत नाही दोन ठिकाणी काम करणे अवघड आहे. निघोजसाठी मला जास्त वेळ देता येत नाही अशी सबब शेतकऱ्यांना सांगत त्या वेळ मारुन नेत आहे.

शेतकऱ्यांना हे कारण सांगण्यापेक्षा त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना ही सबब सांगीतली पाहिजे जेणेकरून निघोज मंडल परिसरातील मंडल विभागाला स्वतंत्र अधिकारी मिळेल व त्या माध्यमातून जनतेची कामे मार्गी लागतील. येत्या आठ दिवसात स्वतंत्र मंडल अधिकारी न मिळाल्यास संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ राज्याचे महसूल मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना भेटेल व निघोज परिसरातील शेतकरी व जनतेची महसूल अधिकारी कशाप्रकारे अडवणूक करतात याची माहिती देण्यात येईल असा इशारा संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे मार्गदर्शक व तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेश लाळगे यांनी दिला आहे.

# भूक छळते तेव्हा कवितासंग्रहास वसंतरावजी नाईक प्रेरणा पुरस्कार प्रदान

## ऊसतोड मजूरांच्या व्यथा आणि वेदनांची दखल



**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील युवा कवी संदीप राठोड यांना महानायक श्री वसंतराव नाईक विचार मंच आयोजित भव्य बंजारा एकता मेळाव्यामध्ये प्रतिष्ठेचा महानायक श्री वसंतराव नाईक प्रेरणा पुरस्कार देऊन नुकतेच गौरविण्यात आले.**

भूक छळते तेव्हा कवितासंग्रहाच्या माध्यमातून विस्थापित ऊसतोड मजुरांच्या व्यथा, वेदनांना समाजापुढे मांडणारे निघोज येथील कवी संदीप राठोड यांच्या साहित्यिक कार्याची दखल घेऊन त्यांना महानायक श्री वसंतराव नाईक प्रेरणा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात केले. देवणी, जि. लातूर येथे पुरस्कार वितरण सोहळा बंजारा समाजाची काशी म्हणून ओळखले जाणारे पोहरादेवी येथील महंत शेखर महाराज यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

यावेळी प्रबोधनकार पंकजपाल महाराज, लातूर माजी जि. प. अध्यक्ष पंडीतराव धुमाळ, माजी जि.प. उपाध्यक्ष संभाजीराव पाटील, तहसीलदार सोमनाथ वाडकर, पोलिस निरीक्षक माणिक डोके, महेश जाधव, किरण कोळपे, तानाजी चव्हाण, वसंतराव नाईक विचार मंचचे संचालक विजय राठोड तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते राठोड यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कवी राठोड हे काव्य लेखनासोबतच विद्यार्थी घडविण्याचे कार्य करत आहेत. उसतोड मजुरांच्या संघर्षावर भाष्य करणारा, गतवर्षी प्रकाशित झालेला त्यांच्या भूक छळते तेव्हा कवितासंग्रहाला वर्षभरात विविध दहा राज्यस्तरीय व एक राष्ट्रीय साहित्य पुरस्काराने गौरविण्यात आलेले आहे.महानायक श्री वसंतराव नाईक प्रेरणा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल राठोड यांचे पारनेर साहित्य साधना मंच, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, निघोज ग्रामस्थ तसेच विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

**सन्मानाने जबाबदारी वाढली**

**भूक छळते तेव्हा कवितासंग्रहास हरित क्रांतीचे प्रणेते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री वसंतरावजी नाईक साहेबांच्या ४५ व्या स्मृती दिनानिमित्त साधूसंत, महंतांच्या हस्ते मिळालेला सन्मान लेखणीची जबाबदारी वाढविणारा आहे. असे प्रतिपादन कवी संदीप राठोड यांनी केले.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com